**<u>नियमित फौजदारी खटला क्र.४८/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.१५</u>**

## दोषारोप

मी, डी.एम.हिंग्लजकर, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, अकोले, तुम्हावर दोषारोप ठेवत आहे की,

छकुल्या उर्फ आशिष संदीप बर्डे,
वय वर्ष– २१,
रा.चास, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**खालीलप्रमाणेः–**

**१.** दिनांक ०८.११.२०२३ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजताचे सुमारास मौजे चास, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे तुम्ही फिर्यादी साहेबराव पाराजी घोडे यांना सरपनातील काठी व दगड, की ज्याने मृत्यु होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**२.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादी यांना काठीने, दगडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीचा मुलगा प्रविण साहेबराव घोडे यांना धक्काबुक्की करून त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**३.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केली व त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा

भंग होईल, किंवा अपराध घडेल अशा प्रकारे त्यांना प्रक्षोभित केले, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**४.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केली, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

आणि यावरुन मी तुम्हाला सुचना करतो की, तुमची माझेसमोर या दोषारोपांची चौकशी होणार आहे.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.07.02 18:23:23 +0530

**दिनांक : २७.०६.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

टिपण :– हा दोषारोप आरोपीस वाचून व समजावून सांगितला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.07.02 18:23:30 +0530

**दिनांक : २७.०६.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**